## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३९/२००९/ दिनांक :

श्री. बाबर दादामियौं पटेल,
९७८, ई, शाहूपुरी, कोल्हापूर अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, कोल्हापूर विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
शहर विभाग, कोल्हापूर

३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
पूर्व उप विभाग(शहर) कोल्हापूर

**<u>कोरम</u> :**–१) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

# महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. के.वाय.जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे                    दिनांक : २७.०७.२००९

सदरचे प्रकरण अर्जदार श्री. बाबर दादामियाँ पटेल यांनी पोष्टाने पाठविले असून या कार्यालयास दि. १५.६२००९ रोजी प्राप्त झाले आहे. अंतर्गत कक्षाचा निर्णय झालेबाबत त्यांनी त्यांच्या अर्जासोबत नक्कल दाखल केलेली आहे. अंतर्गत कक्षाचा निर्णय मान्य न झालेने, या कार्यालयाकडे त्यांनी दाद मागितली आहे.

..२..

अर्जदाराचे म्हणणे की, त्यांनी पूर्वीच्या इमारतीच्या जागेवर नवीन इमारत बांधली असून त्यांना वि.प.तर्फे अद्याप जुने कनेक्शन व मीटर मिळालेले नाही. अंतर्गत कक्षापुढे आलेल्या बाबींप्रमाणे, जुने कनेक्शन तात्पुरते बंद करण्यात आले आहे व ग्राहकाने नवीन इमारत बांधली असलेने त्यास नवीन भार मंजूर करुन नवीन कनेक्शनची मागणी केलेप्रमाणे नवीन जोडणी दिली आहे, मात्र अर्जदाराने जुन्या कनेक्शनची पुर्नजोडणी मागितली आहे.

या कार्यालयाकडील सुनावणीच्या नोटीसीप्रमाणे वि.प.तर्फे श्री. हजारे, उप कार्यकारी अभियंता हजर झाले व म्हणणे देण्यासाठी सुरुवातीस दि. १५.६.२००९ रोजी मुदत मागितली. मात्र त्या सुनावणीच्यावेळी अर्जदार हजर झाले नाहीत. आज रोजी सुनावणीच्या दिलेल्या तारखेला अर्जदारातर्फे कोणीही हजर झाले नाहीत मात्र वि.प.तर्फे श्री. हजारे, उप कार्यकारी अभियंता हजर झाले व त्यांनी या प्रकरणामध्ये लेखी निवेदन सादर केले. तसेच त्यासोबत अर्जदाराच्या मागणीप्रमाणे त्यास नवीन वीज जोडणी दिली आहे तसेच त्यांना जुने कनेक्शनही जोडून दिले आहे. त्यांची आता कांही तक्रार नसलेने त्यांनी आपली तक्रार मागे घेतली आहे अशाप्रकारे अर्जदाराच्या अर्जाची नक्कल मंचासमोर हजर केली आहे. या प्रकरणी अर्जदार हजर झाले नाहीत तसेच त्यांचे जुने कनेक्शन हे पूर्ववत जोडून दिले आहे व त्यांचे तक्रारीचे निराकरण झाले आहे अशा बाबत अर्जदारातर्फे कांही उजर केला नसलेने तो त्यांस मान्य असल्याचे दिसून येते. किंबहुना अर्जदाराने स्वत: दि. २४.७.२००९ रोजी त्यास हवे असणारे वीज कनेक्शन पूर्ववत मिळाले आहे तसेच त्याने यापूर्वी केलेली तक्रार त्यास योग्य माहिती नसल्यामुळे दिली असल्याने त्याने या मंचाकडे दिलेली तक्रार मागे घेतली आहे असे लेखी निवेदन दिलेले आहे. पुनरजोडणीसाठी अर्जदाराने दि. २०.७.२००९ रोजी जरुर ती मिटरची रक्कम भरली आहे व त्याचा विद्युत पुरवठा सध्या सुरु झालेला आहे. परिणामी, अर्जदाराच्या तक्रारीचे निराकरण झाले असल्याने अर्जदाराने तक्रार मागे घेतली असल्याने प्रस्तुत तक्रार निकाली काढणे क्रमप्राप्त ठरते. सबब खालील प्रमाणे आदेश.

## आदेश

१) अर्जदार यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांना वीज जोडणी वि.प.तर्फे दि. २५.६.२००९ रोजी जोडून दिलेली आहे. तसेच अर्जदार यांनी दि. २४.७.२००९ रोजीचे अर्जाप्रमाणे या मंचाकडे दिलेली तक्रार काढून घेतली असल्याने सदरचा अर्ज निकाली काढणेत येत आहे.

२)	खर्चाबाबत आदेश नाही.

३)	या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( के. वाय. जगताप )
अध्यक्ष

दि. २७.७.२००९

ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव :

श्री. जी.सी. लेले, सदस्य :